# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 11.01.2026** **वार- रविवार**

---

**फडणवीस पुणेकर संवाद**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रचाराच्या मुदतीतला आजचा अखेरचा रविवार प्रचार फेऱ्या तसंच मतदारांशी भेटीगाठी घेण्यासाठी सर्वच उमेदवार उपयोगात आणत आहेत. आज सकाळपासूनच सर्वत्र प्रचाराची जोरदार रणधुमाळी दिसत आहे .
दरम्यान भारतीय जनता पक्षाच्या वतीने संवाद पुणेकरांशी या विशेष कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज संध्याकाळी एरंडवणे इथे  पुणेकरांशी थेट संवाद साधणार आहेत.

**रामदास आठवले**

मनपा निवडणुकीत मी ठामपणे भाजप-युतीसोबत आहे, अस प्रतिपादन आरपीआय आठवले गटाचे अध्यक्ष रामदास आठवले यानी केलं आहे. ते येरवडा नागपूर चाळ इथं भाजप आरपीआय युतीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ बोलत होते. महापालिकेत सध्या आमच्या पक्षाला नऊ जागा मिळाल्या असून, निवडणूक उशिराने होत असल्याने इच्छुकांची संख्या वाढली असल्याचं आठवले म्हणाले .

**पिंपरी चिंचवड मतमोजणी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी 32 प्रभागांकरिता प्रत्येक 4 निवडणूक प्रभागांमागे 1 याप्रमाणे एकूण 8 निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांच्या मार्फत मतदान साहित्याचे वाटप तसेच मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर साहित्याची स्वीकृती करण्यात येणार आहे.
तसंच मतमोजणी प्रक्रियेकरिता निगडीतील हेडगेवार भवन, चिंचवड मधील ऑटो क्लस्टर सभागृह, इंद्रायणी नगराधील संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, रहाटणी क्रीडा संकुल, भोसरीतील कबड्डी प्रशिक्षण संकुल, चीखलीतील टाऊन हॉल, थेरगाव मधील गावडे स्मृती कामगार भवन, महापालिका कासारवाडी भाजी मंडई आदी ठिकाणे निश्चित करण्यात आली आहे.

शहरातील समस्यांवर उपाय शोधण्यासाठी पिंपरी चिंचवड सिटीजन फोरम ही स्वयंसेवी संस्था गेली अनेक वर्ष कार्यरत असून या फोरमने राज्यकर्त्यांसाठी जनतेचा अपेक्षानामा काल प्रसिद्ध केला. या अपेक्षानामातून पायाभूत सुविधा, पाणी वाहतूक, प्रदूषण पर्यावरण अशा अनेक समस्यांकडे लक्ष वेधले आहे. वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने सुविधांचा विस्तार व्हावा आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात अशी ही अपेक्षा या अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

**उत्पादन शुल्क**

महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठी मोहीम हाती घेतली असून मोहिमेंतर्गत काल पिंपरी परिसरात परराज्यातून बेकायदेशीररीत्या आणलेले विदेशी मद्य तसेच मद्य वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले एक चारचाकी वाहन असा एकूण 7 लाख 20 हजार 850 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पवनेश्वर मंदिराजवळ ही कारवाई करण्यात आली असून या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**राष्ट्रीय सहकारी साखर महासंघ**

साखरेच्या दरात घट झाल्याने साखर उद्योग आर्थिक अडचणीत सापडला असून, साखरेचा किमान विक्री दर प्रतिकिलो 41 रुपये करावा, तसेच इथेनॉलचा विक्री दर वाढवावा, अशी मागणी राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाच्या वतीन पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह , केंद्रीय अन्नमंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यासंदर्भात राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे शिष्टमंडळ लवकरच केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांची भेट घेणार असल्याच महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी सांगितल.

**फाउंडेशन परीक्षा**

दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या वतीने डिसेंबर 2025 मध्ये घेण्यात आलेल्या फाउंडेशन परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. यंदा 'आय सी एम ए आय' पुणे शाखेचा निकाल 54.40 टक्के इतका लागला असून, पुण्यातील सोहम जोगळेकर आणि राधिका मराठे यांनी राष्ट्रीय स्तरावर गुणवत्ता यादीत अनुक्रमे आठवे आणि नववे स्थान मिळवत अभिमानास्पद कामगिरी केली आहे.

**बाजार**

येत्या आठवड्यात भोगी आणि मकर संक्रांत सण असल्यामुळे आज पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात फळभाज्यांची मोठी आवक झाली. भोगीसाठी लागणाऱ्या ओला हरभरा, पावटा, गाजर ,वांगी यासह हिरवी मिरची, काकडी ,फ्लॉवर ,कोबी यांच्या भावात वाढ झाली असून मागणी वाढल्याने बोरांच्या भावातही 20 टक्क्यांपर्यंत वाढ नोंदवण्यात आली.

**निधन**

बौद्ध साहित्य आणि मानवतावादी समाजसुधारकांच्या कार्यावर आधारित साहित्याची निर्मिती करणारे ज्येष्ठ साहित्यिक आचार्य रतनलाल सोनग्रायांचे आज रविवारी दुपारी पुण्यात वृद्धपकाळान निधन झाले. ते 87 वर्षांचे होते. त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी उद्या सकाळी नऊ ते साडेदहापर्यंत त्यांच्या विमान नगर येथील निवासस्थानी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी साडेअकरा वाजता येरवडा विद्युत दाहिनी या ठिकाणी अंत्यविधी होईल.

पुण्यातील जागतिक कीर्तीचे भूकंपशास्त्र तज्ज्ञ डॉ अरुण बापट यांचं काल निधन झालं. ते 85 वर्षांचे होते. खडकवासला इथल्या केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्रात बापट यांनी भूकंप अभियांत्रिकी संशोधन विभागाचे प्रमुख म्हणून काम केले होते.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**